This file is created through Parivartan on 7/5/2004 at 6:45:21 PM
Input File : D:\JAINWORLD\RATNAKARANDAK\ANVAYARTA.doc
Output File : D:\JAINWORLD\RATNAKARANDAK\ANVAYARTAA.doc
Output font code : ISM 2000 Bilingual Web File (DVBW)
Output font name : DVBW-TTYogesh
For more information email us at : parimail@vsnl.in

अन्वयार्थ - (य:) जो (स्मयेन गर्विताशय:) गर्विष्ठ पुरुष (अन्यायन् धर्मस्थान्) इतर धर्मवान् पुरुषांचा (अत्येति)तिरस्कार करतो (स:) तो (आत्मीयं धर्म) आपल्या धर्माचा (अत्येति) तिरस्कार करतो असे जाणावे. कारण (धार्मिकै: विना) धर्मात्मा पुरुषाशिवाय (धर्म: न) धर्म असू शकत नाही.

विशेषार्थ - जगात धन, ऐश्वर्य, सत्ता ही ज्यांना सुदैवाने प्राप्त होत असतात अशा पुरुषांना त्याबद्दल गर्व वाटू लागतो. त्यावेळी देव-गुरु-धर्माचा विनय करण्याचे देखील त्यांना भान राहत नाही. गर्विष्ठ पुरुषाच्या मनात असे विचार येतात की, देवालय म्हणजे कोण वास्तु आहे( असली देवालये मी शेकडो नवीन निर्माण करीन. हे देवालयही मीच बांधिवली आहे. जे तपस्वी व त्यागी गृहस्थ आहेत तेही माझ्या आधीन असल्यासारखेच आहेत. कारण त्यांना वस्त्रप्रावरण व भोजन वगैरे मीच पुरवितो म्हणून हे जगतात. आज धर्माचे अस्थित्व द्रव्य खर्चण्यावरच अवलंबून आहे. देवांची पूजा, प्रभाना वगैरे पुष्कळ द्रव्य खर्च केले म्हणजे होत असते. अशा विचाराने तो देवधर्म गुरूंची अवज्ञा करू लागतो. याचप्रमाणे अभिमानाच्या त्वेषात अनेक प्रकारचे पापाचरण करीत राहूनही क्वचित् पूजा प्रभावानेमध्ये थोडे द्रव्य खर्चण्याने आपणास मोठेपण प्राप्त झाले असे मानू लागतो. ऐश्वर्याने धुंद झाल्ाने त्यास असे वाटते की, जगात द्रव्य हेच श्रेष्ठ आहे. कारण धनवान पुरुषांच्या घरी मोठमोठे ज्ञानी, शास्त्रपंडित, काव्यकर्ते नेहमी येऊन द्रव्यप्राप्तीच्या आशेने शास्त्रश्रवण करवीत असतात. याचप्रमाणे अनेक कलावान् चतुर पुरुषही येतात. पूजन करणारे, प्रभावना करणारे, भजन करणारे हे धनवंताच्या आश्रयाला राहून त्याच्या मागोमाग फिरून आपली गाणी श्रवण करवीत असतात. एक उपवास, दोन उपवास, तीन उपवास वगैरे व्रत करणारे तपस्वी त्यागीही श्रीमंताच्याच घरी भोजन करण्याकरता येत असतात. मंत्र जपजाप्यादिकही श्रीमंतांना सुध्दा व्हावा म्हणून केल जातात. यावरून सर्व धर्म व सर्व गुम पैश्याच्ा स्वाधीन आहेत. याप्रमाणे ऐश्वर्याने आपण श्रेष्ठ आहोत, आपण कृत-कृत्य आहोत, आपणास आता कशाचीही जरूरी नाही असे समजून श्रीमंत लोक धर्मवान पुरुषाची अवज्ञा करतात. असे पुरुष आत्मज्ञानी, परमार्थी, परमसंतोष धारण करणाऱ्या पुरुषाकडे मुळीच पाहात नाहीत. जय सत्पुरुषांना चक्रवर्तीचीच काय पण इंद्रलोकाची संपत्ती देखील तुच्छ अर्थात् दु:खरूप दिसते, व सत्पुरुष श्रीमेंताचा सहवास स्वप्नात देखील इच्छीत नाहीत. जगातील अल्प पुण्यवान् निर्धन लोक गृहकुटुंबाच पालन होईल या आशेने आपला अभिमान सोडून श्रीमंताच्या घरी ते मोठे दयाळू उपकारी असतील अस जाणून व धर्मवान् पुरुषावर प्रीती करुन त्यापासून आपणा स्वत:स पुण्यप्राप्ती करुन घेणारे असतील असे समजून त्यांचे द्वाराशी येतात. पण श्रीमंताला आपल्ा द्रव्ाचा एव्ह ा मद च्ह लेला असतो की त्याला आपल्या पुढे कोण आला आहे हे दिस नाही. मग दान देण्याची गोष्ट तर दूरच राहिली व उपकार तरी कोण? उलट ते कठिण-हृदयी बनतात. जगात आपला मानभंग होऊ नये व त्यात कमीपणाकशानेही होऊ नये या चिंतेने प्रसंगीमरण पत्करतात. या अतिशय ममत्व व कृपणपणाच्याप्रभावाने नरकतिर्यंचादि गतीमध्ये त्यांना अनंतकाल परिभ्रमण करावे लागते.

ज्यांना ऐश्वर्य प्राप्त होऊनही गर्व होत नाही ते असा विचार करतात की, ((हे धन, हे ऐश्वर्य, ही संपत्ती आमची नव्हे व हे आमचे स्वरुपही नव्हे. पूर्वजन्मी केलेले एखादे पुण्यकर्म उदयास आले आहे. ही संपत्ति नाशवंत आहे त्याअर्थी यापासून कोणावर तरी उपकार होईल

असे कार्य करु. दरिद्री लोकांना होत असलेले दु:ख नाहीसे करु. करुणाभावाने दु:खित जीवावर उपकार करण्याचे कामी धन खर्च करु. जिवनधर्मावर श्रध्दा न ठेवणारे कोणी ज्ञानी पुरुष दरिद्री असतील त्यांना हे धन देऊन त्यांची हे धन देऊन त्यांची आकुलता नाहीशी करु. सर्व जीव धनाची आशा करीत असतात. मी दारिद्री असतो तर मजपासून उपकार व्हावा असे कोणी इच्छिले असते ? आता जर माझेशुभकर्म उदयाला येऊन फल देत आहे तर माझ्या आश्रयाने राहणाऱ्यांचे उदरपोषण मी करीन. बालक, वृध्द रोगी, अनाथ विधवा व अशक्त यावर उपकार करण्यानेच मला धन प्राप्त झाल्याचे सार्थक आहे. याशिवाय दुसरीही अनेक कार्ये आहेत त्यापैकी अशा कार्यात माझे द्रव्य खर्च व्हावे की, त्यापासून जिनधर्माची परंपरा पुष्कळ काल सतत चालू रहावी, ज्ञानाअभ्यासाची परंपराटिकावी, नित्य पूजन, ध्यान, अध्ययन, तप व शील वगैरेनी संसारातून उध्दार करणार्या कार्यची प्रवृतती व्हावी, असे झाले तरच धन प्राप्त झाल्याच सफल झाले व लाभ झाला. जर परोपकारात या द्रव्याचा उपयोग केला नाही, तर हे नाशवंत असल्याने कसे तरी नाहे होणार आहे. कोणाच्याही बरबर ही संपतती परलोकी आजर्यंत गेली नाही. संपततचा उपयोग दान देण्यात केला नाही तर केवळ पाप व दुर्ध्यान उत्पन्न होऊन संसारसमुद्रात बुडवे लागेल. संपत्ती प्रप्ती झाली असेल तर दान करणे हेच तिचे फल आहे. कोट्यवधि माणसांनी पर्वजन्मी दान केले नाही म्हणून तयांना घरोघर भिक्षा मागून पोटभर अन्न मिळत नाही, शरीराच्छादनलाला कापड मिळत नाही. ते दीन होऊन लोकांच्या उच्छिष्टांची आशा करीत आहेत. हे सर्व दान न करण्याचे अर्थात् कृपणतेचे फल आहे. फार काय पण त्यांना मनुष्यांची व पशूंची सेवा करू नही पोटभर अन्न मिळत नाही. दान केल्ाशिवाय पुढे संपत्ती प्राप्त होमार नाही. संपत्तीला दान-धर्ममध्ये लाले तरच तिचे प्राप् होणे सफल होईल. मरणानंतरही संपत्ती परलोकी आपल्या बरोबर येणार नाही. जिथे ठेविली असेल तितेच राहील. तयाअर्थी कोणा एखादया जीवावर उपकार करण्यात खर्च होईल तीच आपली म्हणावी व त्यापासूनच पुढे काही उपयोग झाला तर होईल.(( याप्रमाणे समयग्दृष्टी पुरुष विचार करुन आपल सपतती परोपकार करण्यत खर्च करण्याविषयी नेहमी तयार असतात.

यद्यपि धर्मवान् पुरुषांना संपत्ती ग्रहण करण्यायोग्य नाही, कारण तिच्यापसून मोह उत्पन्न होऊन आत्म्याला भुरळ पडते, म्हणून ज्ञानी पुरुष तिला आपल्यापाशी ठेवीत नाहीत. तरी जया जीवोंचा चारित्रमोहाच्या उदयाने रागभाव कमी होत नाही त्यांनी आपली संपत्ती परजीवावर उपकार करण्यत अवश्य खर्च करावी. अतिशय कष्ट करून मिळिवलेल्या संपत्तीला उत्तम कार्यकडे लावमयाचे सोडून ती इथेच ठेवून जाण्यात आपले काय बरे व्हावयाचे ( याप्रमाणे विचर करून जे पापभीरू लोक निंधन, रोगी, दु:खितांना पाहून त्यांची अवज्ञा न करता, आपलय शक्तीप्रमणे द्रव्य खर्चून त्यांचे दु:ख नाहीसे करतात, जे आपले धन शुभरकार्याकडे खर्चणाऱ्या इतर लोकाकडे पाहून स्वत: आनंद मानतात व जे धर्मासाधन करण्यात सामील होऊन आपले धन त्यात मिळवून त्यांचा योग्य खर्च करण्यात संतुष्ट असतात, त्यांचेच संपत्ती प्राप्त होण्याचे सार्थक झाले असे समजावे.

पुढे, परलोकी देवांचे ऐश्वर्य व चक्रवर्तीची संपत्ती ही दानी पुरुषांनाच प्राप्त होते व ज्यांना संपत्तीविषयी प्रेम वाटते त्यांना तिचे स्वरुप सांगण्याकरिता सूत्र सांगतात -

यादी पापनिरोधा(न्यसम्पदा कि प्रायोजनं ।<br>अथ पापास्त्रवो(स्त्यन्यसम्पदा कि प्रायोजनं ।।२७।।

अन्वयार्थ - (यदि) जर (पापनिरोध:) ज्ञानावरणादि अशुभ पाप प्रकृतींचे आस्त्रव येण्याचे बंद झाले असेल तर (अन्यसंपदा) इतर संपत्तीशी माझे (किं प्रयोजनं) काय प्रयोजन आहे ( (अथ) व जर (पापास्त्रव:) पापाचे आस्त्रव होत असतील तर (अन्यसंपदा) धनसंपत्ती असून तरी (किं प्रयोजनं) काय करावयाचे (

विशेषार्थ - जीवाने संयम धारण करून पाप उत्पन्न होण्याची कारणे जर नाहीशी केली असतील तर इंद्रियांना विषयभूत असणारी इतरऐहिक राज्य-वैभवादि संपत्ती प्राप्त झाली नाही, म्हणून दु:ख मानण्याचे कारण नाही, कारण आस्त्रवाचा निरोध केल्याने क्रमाने स्वर्गातील अहमिंद्राचे ऐश्वर्य व निर्वाणसंपदा प्राप्त होणार आहे. त्यापुढे या क्षणभंगुर व दु:खमय ऐहिक संपत्तीचा काय पाड ( जीवाने पापाचे आस्त्रव होऊ न दिलयास त्याला अत्यंत मोठी निर्वाणसंपदा प्राप्त होते. पण ज्यस अन्याय, अनीती, कपट, चोरी वगैरे कृत्ये करून पापास्त्रव निरंतर होत असतील, पुष्कळसा धनसंचयही होत असेल, तर त्याचा तरी काय उपयोग होणार ( कारण त्यस लौकरच इहलोक सोडून जावे लागणार. तयवेळी दुष्कृत्‌मुळे तत्कल नरकात उत्पन्न व्हावे लागेल. यामुळे समयग्दृष्टि जीव पाप कर्मच्य आस्त्रावाला फार भीत असतो. तो पापाचे आस्त्रव येण्याचे बंद झाले म्हणजे आपणास मोठ्या ऐश्वर्याचा लाभ झाला असे समजतो. संसारातील संपदेला पराधीन व दु:खदायक जाणून ती प्राप्त व्हावी अशी तो इच्छा करीत नाही. कदाचित् लाभांतराय व भोगांतराय कर्माच्या क्षयोपशमामुळे तयाला ती प्राप् झाली तरी तीला विनाशिक व बंधकारक जाणून तिजमध्ये आसक्त होत नाही. ती वर्तमान कालच्या किंचित् दु:खाला नाहीशी करणारी आहे असे जाणून तिजिवषयी उदासीन असतो व कडू औषधाप्रमाणे तिचा उपभोग घेतो. संपत्त हीच आपलेक लयण करणारी आहे असे समजून ती प्राप्त व्हावी म्हणून मुळीच इच्छा करीत नाही.

सहा अनायतनाचे स्वरुप

कुदेव, कुगुरु, कुशास्त्र व कुदेवाचे श्रद्दान करणारा, कुगुरूची सेवा करणारा आणि कुशास्त्र शिकमारे असे मिथ्यात्वाचे सहा प्रकार आहेत. हे धर्माचे आयतन म्हणजे स्थान नव्हेत. यापासून आपली कधीही हित होणार नाही म्हणून याना (अनायतन( असे म्हटले आहे, यांचे संक्षेपाने सवरूप असे आहे.

ज्यामध्ये सर्वज्ञपणा नाही. वीतरागपणा नाही, जो कामी, क्रोधी, चोर, जरांचा शिरोमणि आहे, ज्यला भोजनाची व मांसभक्षण करण्याची इच्छा आहे, जो क्रोधी व लोभी असून सर्वांनी आपली पूजा करावी असे इच्छितो, जीवांची घात करणारा असून आपल्याच भकतांवर उपकार करून अभकतंचा नाश करणारा आहे, ज्याला पुष्कळ मूढ लोक दवबुध्दीने पूजतात, तो देवपणाचे आयतन नव्हे, म्हणजे तो खरा देव नव्हे, त्याला खरा देव म्हणणे अथवा त्याठिकाणी दवबुध्दि ठेवणे हे मिथ्यात्व आहे.

ज्यांना व्रत संयम वगैरे मुळीच नाी. पण अनेक प्रकारचे खोटे वेष धारण करन जगाला भुलविण्यात जे तत्पर असतात, अशा लोकांच्या ठिकामी व्रत, तप, त्याग, विद्या, ध्यान, परिग्रहत्याग वगैरे क्रिया पाहून मंत्र, तंत्र, ज्योतिष, शकुन व इंद्रजालादि विद्यपाहून, अनेक मूर्ख लोक त्यांची पूजा करतात म्हणून जिनाज्ञेचे उल्लंघन करून वागणार्या पाकंडी भेषधारी माणसांमध्ये गुरुपणा मानणे हे मिथ्यात्व आहे.

खोटे व हिंसेचे पोषण करणारे शास्त्र श्रवण करण्यापासून आत्महित होत नाही म्हणून ते सम्यग्ज्ञानाचे आयतन नव्हे. याच प्रमाणे कुदेव, कुगुरू , कुशास्त्र व यांचे सेवन करणारे तीन अशा एकूम सहा स्थानापासून आपले कल्‌ाण होणार नाही. म्हणून सम्यग्दृष्टी पुरुष त्यांची प्रशंसा करीत नाहीत.

याप्रमाणे सम्यग्दर्शनाचा घात करणारे तीन मूढता, आठमद, आठ शंकादि दोष व सहा अनयातन अशा पंचवीस दोषांचा त्याग करून व्यवहार सम्यग्दर्शन धारण करण्याने निश्चय सम्यग्दर्शन प्राप्त करून घेता येते. ज्याला पंचवीस दोष टाळून आप्त्म्याचे श्रध्दान होते त्यालाच

निश्चय सम्यग्दर्शन होण्याचा नियम आहे. ज्यच बाह्य दोष नाहीसे तहो नाहीत त्याचे अंतरंग सम्यग्दर्शनही शुध्द होऊ शकत नाही

सम्यक्त्वाचे भेद आणि उत्पत्ती कशी होते हे पाहू.

सम्यक्त्व तीन प्रकारचे आहे. उपशम सम्यक्त्व, क्षायोपशम सम्यक्त्व आणि क्षायिक सम्यक्तव. संसारी जीव आनादिकालापासून आठ कर्मांनी बांधला गेला आहे. त्यात मोहनीय कर्माचा जो दर्शनमोहनीय नामक भेद आहे , त्याचे मिथ्यात्व , सम्यङ्मिथ्यात्व व सम्य्प्रकृति असे ती भेद आहेत , व चारित्रामोहनीयाचा भेद जो अनंतानुबंधी क्रोध , ज्ञान , मान , माया , लोभ हे चार भेद , अशा एकूण सात प्रकृती सम्यक्त्वाचा घात करणाऱ्या आहेत . या सात प्रकृतीच्या उपसमापासून उपशम सम्यकत्व , क्षयोपासून क्षायिक व क्षयोपक्षापासून क्षायोपशमिक सम्यक्त्व होते . या क्षायोपशमिक सम्यकत्वाला वेदकसम्यक्त्वही म्हणतात. अनादी मिथ्यादृष्टि जीवाला प्रथमत: उपमश सम्यक्वाच होते . मिथ्यादृष्टि जीवाला मिथ्यात्वाचा उपशम होऊन जे सम्यकत्व होते , त्यास प्रथोमशम सम्यकत्व म्हटले आहे उपश्रेणीच्या प्रारंभी क्षयोपशम सम्यकत्वापासून जे उपशमसम्यक्त्व हाते ते व्दितीयोपशम सम्यकत्व होय . मिथ्यादृष्टि जीवाला मिथ्यात्वगुणस्थानापासून उपशम्यकत्व कसे उत्पन्न होते याचा श्रीलब्धिसार ग्रंथाच्या आधाराने थोडा विचार करु.

सम्यग्दर्शन हे चार ही गतींॉमध्ये अनादी मिथ्यादृष्टी व सादी मिथ्यादृष्टीला उत्पन्न होत असते . पण ते संज्ञी (मन असणाऱ्या) जीवालाच उत्पन्न होते . असंज्ञी जीवाला उत्पन्न होत नाही . पर्याप्त जीवालाच प्राप्त होते , अपर्याप्ताला होत नाही . मंद कवाषी असेल त्यालाच उत्पन्न होते . तीव्र कषाय असतील त्याला होत नाही . भव्य असलेल त्याला उत्पन्न होते. अभव्याला होत नाही. गुणदोषाचा विचार असणाऱ्या साकारोपयोग (ज्ञानोपयोग) युक्त जीवालाच उत्पन्न होते, दर्शनोपयोगी अवस्ते हत नाही. जागृत अवस्थेत उत्पन्न होते, निद्रावस्तेत होत नाी. सम्मूर्छन जीवांना उत्पन्न होत नाही. पाच व्ाकरलब्धीतील उत्कृष्ट असा अनिवृत्तिंकरणाच्या अंतसमयामध्ये दसनालब्दि, प्रयोग्यलब्धि आणि करणलब्दि असा पाच लब्धी असल्ासिवाय सम्यक्त्व होत नाही. यातून चार लब्दी संसारात भव्य किंवा कदाचित अभव्य जीवालाही होतात. पण करणलब्धि मात्र ज्याला सम्यक्त्व व चारित्र प्राप्त व्हायचे असेल असा भव्य जीवालाचा होत असते.

क्षयोपशम लब्दीचे स्वरूप असे आहे - ज्याला काली असा सयोग येऊन प्राप्त होतो की, आट कर्मातील ज्ञानावरणादिक समस्त अप्रशस्त प्रकृतीची शक्ी (अनुबाग) प्रत्ेक समयला जीवाला क्षयोपशम लब्दि प्राप्त होते. सर्व घातिस्पर्ध्दकांचा उदय आणि बविष्यत्कालीन उदयास येणार्या सर्व घातिस्पर्ध्दकांचा सदवस्थारूप उपशम अशा योग्यतला क्षयोपशमलब्धि म्हणतात.

प्रथमत: झालेल्या क्षयोपशम लब्धीच्या प्रभावाने जीवाला उत्पन्न झालेल्या सातावेदनीयादि शुभ प्रकृतींच्या बंधाला कारण असे जे धर्मानुरागरूप शुभ परिणाम त्यांची प्राप्ती होणे याला विशुध्दिलब्धी म्हणतात. अशुभ कर्म आपण रस देऊन नाहीसे झाल्यानंतर जीवाला संक्लेशपरिणामाचा अभाव झाल्यने मंदरागरूप विशुध्दपरिणामांची प्राप्ती होत असते.

षड्द्रव्य, नवद्रव्यपदर्थाचा उपदेश करणाऱ्या आर्चायांचा लाभ होणे, त्यांचा उपदेश प्राप्त होणे, व त्यानी उपदेशिलेल्या धर्मत्वाला धारण करण्याची शक्ती प्राप्त होणे यास देशनालब्धी म्हणतात.

वर जेथे कोणी उपदेश करणारा नाही तेथे पूर्वजन्मी धारण केलेल्या तत्वार्थाच्या संस्कारलबाने सम्यग्दर्शन होते.

वर सांगितलेल्या तीन लब्धींच्या द्वारे त्या जीवाची प्रत्येक समयात विशुध्द परिणामांची वृध्दी होत होत आयुकर्माशिवाय सात कर्माची अंत:कोडाकोडीसागरमात्र स्थिती शिल्लक राहते. पूर्वी असेल्या कर्मस्थितीला (एक कोटाकोटीहून अधिक सागराला) एक कांडकाने१ भागून येणाऱ्या कांडकद्रव्याला, अवशेष असलेल्या स्थितीत मिळिवल असता अंत:कोडाकोडी सागर स्थिती होते. घातिकर्माचा रस, दारू व लतारुपाने वशेष राहतो, शैलअस्थिरूप राहात नाही.अघातीचा रस निंब-कांजीररूपाने असतो, विष-हालाहल स्वरूपाने राहात नाही. पूर्वी जो अनुभाग (रस) होता तयाला अनंताचा भाग देऊन जो बहुभाग मात्र अनुभाग राहील त्याचही नाश करून शेष राहिलेल्या एक भागमत्र अनुभागाचा तो जीव अनुभव घेत राहतो. या प्रकाराने कर्म क्रमाक्राने कमी करण्याच्य विधीला प्रायोग्यलब्धि म्हणतात. ही भव्य अथवा अभव्य या दोहोंनाही सारखीच होते. संक्लेशपरिणामी संज्ञी, पंचेद्रिय, यर्याप्त जीवाला संभवणारा उत्कृष्ट स्थितिबंध व उत्कृष्ट अनुभाग प्रदेशाचे सत्व, अस्थित्व असतांना प्रथमोपशम समयक्त्व प्राप्त होत नाही. तसेच विशुध्द क्षणक श्रेणीमध्य संभवणारा जघन्य स्थितीबंध व जघन्य स्थितिअनुमगप्रदेशाचे सत्व-अस्तित्व असतांनाही प्रथमोपशमसम्यक्त्वाची प्राप्ती होत नाही. प्रथमोपशमसमयक्त्वाच्या सन्मुख झालेल मिथ्यादृष्टि जीव, आपली विशुध्दता वाढवीत आयुकर्माशिवाय सात कर्मचा स्थितिबंध प्रयोग्यलब्धीच्य प्रथम समयापासून पूर्वस्थितीच्य संख्यांतावा भाग अंत:कोडाकोडीसागर प्रमाण करतो. त्या अंत:कोडाकोडी सागर स्थितिबंधाचा पल्याच्या संख्यातावा भागाइतका कमी होणारा स्थितिबंध अंतर्मुहूर्तपर्यंत समन रूपाने होतो. त्यानंतर त्यहूनही पल्यचा असंख्यत भाग मात्र घटत जदाणारा स्थितिबंध अंतर्मुहूर्त पर्यंत समनरूपाने होतो. याक्रमाने संख्यात स्थितिबंधापसरणाच्या योगे पृथक्त्व शंबर सागर कमी झालयाने दुसरे प्रकृतिबंधापसरण होते. यप्रमाणे स्थितिबंध घटत असता एक स्थान होते. अशी प्रकृतिबंधापसरणाची स्थाने चौतीस आहेत. य ठिकाणी पृथक्त्व म्हणजे सातशे अथवा आठशे सागर जाणावे. य ठिकाणी कोणकोणत्या प्रकृतीचा, प्रथमोपशम समयक्त्वपर्यंत कसकसा बंध होत नाही याचा विचार करणे यास बंधापसरण महणतात.

### ३४. वधापसरण

१) नरकायु, २) तिर्यचायु, ३) मनुष्यायु, ४) देवायु, ५) नरकगति-नरकगत्यानुपूर्वी, ६) सूक्ष्म साधारण अपर्याप्त, ७) सूक्ष्म प्रत्येक अपयोप्त, ७) सूक्ष्म प्रत्येक अपर्याप्त, ८) बादर साधारम अपर्याप्त, ९) बादर प्रत्येक अपर्याप्त, १०) द्वीद्रिंय अपर्याप्त, ११) त्रीद्रिय अपर्याप्त, १२) चतुरिंद्रिय अपर्याप्त, १३) असंज्ञी पंचेंद्रीय अपर्याप्त, १४) संज्ञी पंचेद्रिय अपर्याप्त १५) सूक्ष्म साधारण पर्याप्त, १६) सूक्ष्म प्रत्येक पर्याप्त, १७) बादर साधारण पर्याप्त, १८) आतप बादर प्रत्येक पर्याप्त एकेंद्रिय, १९) द्वीद्रिय पर्याप्त, २०) त्रीद्रिय पर्यप्त, २१) चतुरिंद्रिय पर्याप्त, २२) असंज्ञी पंचेद्रिय पर्याप्त, २३) तिर्यचगति-तिर्यचगत्यानुपूर्वी, उद्योत, २४) नीचगोत्र, २५) अप्रशस्त विहायोगति, दुर्भग, दु:स्वर, अनादेय, २६) हुंडकसंस्थान, असंप्राप्तसृपाटिका, २७) नपुंसकवेद, २८) वामनसंस्थान, नराचसंहनन, ३२) न्यग्रोध परिमंडळ संस्थान, वज्रनाराच, ३३) मनुष्यगति-मनुष्यगत्ानुपूर्वी, औदारिकशरीर-औदा, अंगोपांग वज्रर्षभनाराच सहंनन, ३४) अस्थिर अशुभ, अयश:कीर्ति, अरति, शोक असातावेदनीय.

पाचवी करणलब्धी भव्य जीवालाच होते अभव्याला होत नाही या लब्धीत अध:करण, अपूर्वकरण व अनिवृत्किरणे असे तीन प्रकारचे कारण (परिणाम) होते असतात. याठिकाणी करण याचा अर्थ(कषायांची मंदता झाल्याने होणारे शुध्द आत्मपरिणाम( ्सा आहे. अनुवृत्तिकरणाचा काल अल्पअंतर्मुहूर्त आहे. त्याहून संख्ातपट अधिक अपूर्व करणाचा काल आहे व त्यहून संख्यातपट अधिक अध:प्रवृत्ति करणाचा काल आहे व हाही अंतर्मुहूर्त प्रमाणच आहे. कारण अंतर्मुहूर्ताचेही असंख्यात भेद आहेत.

या अध:प्रवृत्तिकरणाच्या कालात अती अनागत वर्तमान अशा त्रिकालवर्ती अनेक जीवांचे विशुध्द परिणाम असंख्यात लोक प्रमाण होत असतात व ते प्रिणाम अध:प्रवृत्तिकरमाचे जितके समय आहेत तेव्ढ ्या समान वृध्दीच्या अपेक्षेने प्रत्येक समयामध्ये वाढ त असतात. या करणातील खालच्या समयातील परिणामांची संख्या व विशुध्दता वरील समयातील जीवांच्या परिणामाशी मिळते, म्हमून यांचे अध:प्रनवृत्तिकतरण असे नांव आहे. या अध:प्रवृत्तिकरणात परिणामाची अनुकृष्टि रचना होते.

अनुकृष्टि रचना संदृष्टि

(एकूण परिणाम ३०७२) (काल १६ समय)

| काल | परिणाम संख्या | प्रथमखंड | व्दितीयखंड | तृतीयखंड | चतुर्थ खंड |
|---|---|---|---|---|---|
| १६ | (२२२)<br>६९१ ते ९१२ | (५४)<br>६९१ ते ७४४ | (५५)<br>७४५ ते ७९९ | (५६)<br>८०० ते ८५५ | (५७)<br>८५६ ते ९१२ |
| १५ | (२१८)<br>६३८ ते ८५५ | (५३)<br>६३८ ते ६९० | (५४)<br>६९१ ते ७४४ | (५५)<br>७४५ ते ७९९ | (५६)<br>८०० ते ८५५ |
| १४ | (२१४)<br>५८६ ते ७९९ | (५२)<br>५८६ ते ६३७ | (५३)<br>६३८ ते ६९० | (५४)<br>६९१ ते ७४४ | (५५)<br>७४५ ते ७९९ |
| १३ | (२१०)<br>५३५ ते ७४४ | (५१)<br>५३५ ते ५८५ | (५२)<br>५८६ ते ६३७ | (५३)<br>६३८ ते ६९० | (५४)<br>६९१ ते ७४४ |
| १२ | (२०६)<br>४८५ ते ६९० | (५०)<br>४८५ ते ५३४ | (५१)<br>५३५ ते ५८५ | (५२)<br>५८६ ते ६३७ | (५३)<br>६३८ ते ६९० |
| ११ | (२०२)<br>४३६ ते ६३७ | (४९)<br>४३६ ते ४८४ | (५०)<br>४८५ ते ५३४ | (५१)<br>५३५ ते ५८५ | (५२)<br>५८६ ते ६३७ |
| १० | (१९८)<br>३८८ ते ५८५ | (४८)<br>३८८ ते ४३५ | (४९)<br>४३६ ते ४८४ | (५०)<br>४८५ ते ५३४ | (५१)<br>५३५ ते ५८५ |
| ९ | (१९४)<br>३४१ ते ५३४ | (४७)<br>३४१ ते ३८७ | (४८)<br>३८८ ते ४३५ | (४९)<br>४३६ ते ४८४ | (५०)<br>४८५ ते ५३४ |
| ८ | (१९०)<br>२९५ ते ४८४ | (४६)<br>२९५ ते ३४० | (४७)<br>३४१ ते ३८७ | (४८)<br>३८८ ते ४३५ | (४९)<br>४३६ ते ४८४ |
| ७ | (१८६) | (४५) | (४६) | (४७) | (४८) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २५० ते ४३५ | २५० ते २९४ | २९५ ते ३४० | ३४१ ते ३८७ | ३८८ ते ४३५ |
| ६ | (१८२)<br>२०६ ते ३८७ | (४४)<br>२९५ ते ३४० | (४५)<br>२५० ते २९४ | (४६)<br>२९५ ते ३४० | (४७)<br>३४१ ते ३८७ |
| ५ | (१७८)<br>१६३ ते ३४० | (४३)<br>१६३ ते २०५ | (४४)<br>२९५ ते ३४० | (४५)<br>२५० ते २९४ | (४६)<br>२९५ ते ३४० |
| ४ | (१७४)<br>१२१ ते २९४ | (४२)<br>१२१ ते १६२ | (४३)<br>१६३ ते २०५ | (४४)<br>२९५ ते ३४० | (४५)<br>२५० ते २९४ |
| ३ | (१७०)<br>८० ते २४९ | (४१)<br>८० ते १२० | (४२)<br>१२१ ते १६२ | (४३)<br>१६३ ते २०५ | (४४)<br>२९५ ते ३४० |
| २ | (१६६)<br>४० ते २०५ | (४०)<br>४० ते ७९ | (४१)<br>८० ते १२० | (४२)<br>१२१ ते १६२ | (४३)<br>१६३ ते २०५ |
| १ | (१६२)<br>१ ते १६२ | (३९)<br>१ ते ३९ | (४०)<br>४० ते ७९ | (४१)<br>८० ते १२० | (४२)<br>१२१ ते १६२ |

या अध:करणात वरील वरील परिणाम खालच्या खालच्या परिणामासारके असतात. म्हणून या परिणामास अनुकृष्टिरचना म्हणतात. अधऋकरणाचा काल अंतर्महूर्त आहे. त्याचे असंख्यात समय होतात. पण येथे १६ समय संदृष्टित मानली आहे. प्रत्येक समयाचे ४ खंड होतात. पहिल्या समयातील प्रथमखंडाचे परिणाम १ ते ३९ हे पहिल्याच समयात असतात. द्वितीय आदिसमयात नसतात. परंतु पहिल्या समयातील दुसऱ्या खडाचे प रिणाम ४० ते ७९ हे दुसऱ्या समयाच्या पहिल्या खंडात देखील असतात. तसेच पहिल्या समयातील तिसऱ्या कंडाचे ८० ते १२० परिणाम दुसऱ्या समयातील दुसऱ्या खंडात व तिसऱ्या समयातील पहिल्या खंडात देखील असतात. तसेच पहिल्या समयातील चवथ्या समयाच्या पहिल्या खंडात देखील सारखे असतात. याच्या परिणामांची संख्या विशुद्धतेचा लौकिकदृष्टांत व अलौकिक संदृष्टि गोम्मटसार व लब्धिसार ग्रंथात वर्णिली आहे. तेथे पहावे. अध:प्रवृत्तिकरणाच्या परिणामाच्या प्रभावाने चार आवश्यके होतात. पहिले अनंतगुणविशुद्धी प्रत्येक समयात अनंतपट विशुद्धतेची वृद्धि होणे, दुसरे स्थितिबंधापसरण म्हणजे पूर्वी जेव्ह्र्या प्रमाणात कर्मांचा स्थितबंध होत होता त्याहून कमी कमी स्थितबंध होत जाणे, तिसरे साताअनुभाग बंधोपचय-सातावेदनीयादि प्रशस्त कर्माच्या ज्या प्रकृती आहेत त्यंचया प्रत्येक समयाला वद्ध ता गूळ, खांड, शर्करा, अमृताप्रमाणे चतु:स्थानी अनुभागबंध होणे व चौथा असाताबंधापचय असातावेदनीयादि अप्रश्स्त कर्मप्रकृतीचा अनंतपटीने घटत, निंब-काजीराप्रमाणे द्विस्थानीय बंध होणे, विषहलाहलरू प न होणे, अशी चार आवश्यके होतात.

अध:प्रवृत्तिकरणाचा अंतर्मुहूर्तकाल गेला म्हणजे दुसरे अपूर्वकरण होते. अध:करणाच्या परिणामाहून अपूर्वकरणाचे परिणाम असंख्यातलोकपटीने अधिक आहेत, ते अनेक जीवांच्या अपक्षेने आहेत. एक जीवाच्या अपेक्षेने एका समयात एकच परिणाम होतो. एका जीवाच्या अपेक्षेने जेव्हढे अपूर्वकरणाचे अन्तर्मुहूर्तकालातील समय आहेत तेव्हढे परिणाम आहेत.

याचप्रमाणे अध:करणाचाही एका जीवाचा एक समयात एकच परिणाम असतो. अनेक जीवांच्या अपेक्षेने एक समयाला योग्य असंख्यात पिरणाम आहेत. ते अपूर्वकरणाचे परिणामही प्रत्येक समयात सदृश (समान वृद्धीने) वाढ़ात. या अपूर्वकरणाचे परिणाम खालच्या समयसंबंधी परिणामाशी समान नाहीत. प्रथम समयाच्या उत्कृष्ट विशुद्धतेहून द्वितीयसमयाची जघन्य विशुद्धता ही अनंतपटीने जास्त असते, असे पिरणाम अपूर्णव असतात म्हणून या दुसऱ्या करणाला अपर्वूकरण म्हटले आहे. अपूर्वकरणाचे प्रथम समयापासून म्हणजे त्या त्या समयाच्या शेवटच्या समयापर्यंत जघन्यापासून उत्कृष्ट व पूर्वसमयाच्या उत्कृष्टापासून उत्तम समयाच्या जघन्य, अशा क्रमाने होणारे परिणाम अनंतपट शुद्ध होत जातात. ते सर्पाच्या गतीप्रमाणे कमी अधिक होत राहतात. येथे अनुकृष्टि (पूर्व परिणामांची उत्तर परिणामाशी समानता) नाह अपूर्वकरणाच्या पहिल्या समयापासून यावत् सम्यक्त्व मोहनीय मिश्रमोहनीयाच्य पूर्ण कालात गुणसंक्रमणाच्या योगे मिथ्यात्वाला सम्यक्त्व मोहनीय, मिश्रमोहनीयरूप परिणमवीत अंतसमयापर्यन्त गुणश्रेणी, गुणसंक्रमण, स्थितिखंडन, अनुभागखंडन ही चार आवश्यके होतात. स्थितिबंधापसरण अध:करणाच्या प्रथम समयापासून गुणसंक्रमणाचा काल पूर्ण होईपर्यंत होत असते. यद्यपि प्रायोग्यब्धीने स्थितबंधापसरण होत असते, तथापि, प्रायोग्यलब्धीत सम्यक्त्व होण्याचा निश्चय नसल्याने त्यचे ग्रहण केले नाी. स्थितिबंधापसरणाचा काल व स्थितिकांडकोत्करणाचा काल दोन्ही समान अंतर्मुहुर्ताचे असतात. त्या ठिकाणी पूर्वी बांधिलेले व सत्तेत असलेले कर्मपरणाणुरूप द्रव्य त्यातून काढून गुणश्रेणीत दिले जाते व त्याची गुणश्रेणी कालातील प्रत्येक समयात असंख्यातपटीच्या क्रमाने पंक्तिबद्ध निर्जरा होत जाते म्हणून तिला गुणश्रेणीनिर्जरा म्हणतात. प्रत्येक समयात गुणाकाराच्या क्रमाने, अनुक्रमाने विवक्षित प्रकृतीचे परमाणू पलटून दुसऱ्या प्रकृतिस्वरूपाचे होणे यास गुणसंक्रमण म्हणातात. पूर्वी बांधिलेल्या व सत्तेत असलेल्या कर्मप्रकृतीच्या स्थिति कमी करणे यास स्थितिखंडन म्हणतात. पूर्वी बांधिलेल्या व सत्तेत असलेल्या अशुभ प्रकृतीचा अनुभाग अनंतपट कांडक (समूह) रूपाने वाढत जातो व अप्रशस्त प्रकृतींचा अनुभाग अनंताव्या भागाइतका अंतसमयापर्यंत कमी होत जातो. या स्थितिखंडादिविधानाचे वर्ण अतिशय विस्ताराने लब्धिसार ग्रंथात आहे. तेथे पहावे. येथे प्रकरणवश संक्षेप सांगितला आहे. याप्रमाणे अपूर्वकरणामध्ये सांगितलेले स्थितिखंडादि कार्यविशेष अनिवृत्तिकरणातही होतात, यात फरक हाच की, समानसमयवर्ती नाना जीवांचे सारखे परिणाम असतात. कारण अनिवृत्तिकरणाच्या अंतर्मुहूर्ताचे जितके समय आहेत. तितकेच अनिवृत्तिकरणाचे परिणाम आहेत म्हणून प्रत्येक समयात एकेक परिणाम आहे असे म्हटले आहे. या ठिकाणी स्थितिखंड व अनुभागखंडाचा प्रारंभ दुसऱ्याच तऱ्हेने होत असतो. कारण अपूर्वकरण परिणामात जे स्थितिखंडादिक होतात, त्यची अंतसमयातच समाप्ती होत असते. तेथे अंतकरणादि विधि कोणती वगैरे वर्ण विस्तारभयास्तव करता येत नाी म्णून ते वर्ण लब्धसार ग्रंथावरून पाहावे.

अनिवृत्तिकरणाच्या अंतसमयामध्ये दर्शनमोहनीय व अनंतानुबंधी चतुष्काच्या प्रकृतिप्रदेश अनभागाचा संपूर्ण उदय होण्याची अयोग्यता असल्याने त्या कर्मांचा उमशम होतो व तत्त्वार्थश्रद्धानरूप सम्यग्दर्सन प्राप्त होते, त्यामुळे त्यास उपशमसम्यग्दृष्टि म्हणतात. हे सांगणयाचे या ठिकाणी मुख्य प्रयोजन आहे. म्हणून तो जीव प्रथम समयामध्ये, द्वितीय स्थितीमध्ये असणाऱ्या मिथ्यात्व द्रव्याला, स्थितिकांडक व अनुभागकांडक यांचा घात न करता गुणसंक्रमणाचा भाग देऊन मिथ्यात्व, सम्यङ्मिथ्यात्व आणि सम्यक्त्व अशा तीन प्रकारात रूपांतर करतो.

तात्पर्य - बंध होतांना दर्शनमोहनीय कर्म एकच प्रकारचे असते. ते द्रव्य सत्तेमध्ये करण्याच्या (परिणामाच्या) प्रभावाने तीन प्रकारची शक्ती धारण करून वेगवेगळे बनते. याप्रमाणे मिथ्यादृष्टीला सम्यक्त्व होण्याला कारण अशा पाच लब्धींचे स्वरूप संक्षेपात सांगितले.

उपशमसम्यंक्त्वाचा जघन्य व उत्कृष्टकाल अंतर्मुहूर्त आहे. हा काल पूर्ण झाल्यानंतर नियमाने दर्शनमोहनीय कर्माच्या तीन प्रकृतीतून एकेकाचा उदय होतो. त्यावेळी जर सम्यक्त्वमोहनीयाचा उदय असेल तर उपशमसम्यक्त्व सुटून जीवाला वेदक सम्यक्त्व होते. व सम्यक्त्वमोहनीच्या उदयाने वेदक-सम्यग्दृष्टि चल मल इत्यादि दोषयुक्त तत्वांचे श्रद्धान करतो. समक्त्व मोहनीयाच्या उदयाने या श्रद्धानात चंचलपणा अथवा इतर अतिचार (दोष) उत्पन्न होतात, अथवा श्रद्धानात शिथिलपणाही प्राप्त होतो. या वेदक समक्त्वालाच क्षयोपशमसम्यक्त्व असे नाव आहे. कारण दर्शन मोहनीयाच्या सर्वघाती स्पर्द्धकांच्या उदयाचा अभाव हाच क्षय व देशघाति स्पर्द्धकांचा उदय व त्या सम्यक्त्वमोहनीयाच्याच वर्तमान समयाशिवाय वरच्या इतर निषेकांचा उदय न होता त्याचे सत्तेत अस्तित्व रूप उपशम होतो. त्यामुळे होणाऱ्या आत्म्याच्या विशुद्ध परिणामाला क्षयोपशमसम्यक्त्व म्हणावे. यालाच सम्यक्त्व प्रकृतीच्या उदयाचे वेदन म्हणजे अनुभवन होते म्हणून वेदकसम्यक्त्व असेही म्हणावे. यालाच सम्यक्त्व प्रकृतीच्या उदयाचे वेदन म्हणजे अनुभवन होते म्हणून वेदकसमक्तव असेही म्हणतात. उपशमसम्यक्त्वाचा अंतर्मुहूर्तकाल उलटल्यानंतर जर सम्यग्मिथ्यात्वाचा उदय होईल तर तो जीव तिसऱ्या मिश्रगुणस्थानवर्ती बनतो. त्यायोगे त्यास तत्त्व अतत्तव या दोहोंचे मिश्र श्रद्धान होते व मिथ्यात्वाचा उदय झाला तर मिथ्यादृष्टि (विपरीत श्रद्धानी) बनतो. ज्वरयुक्त पुरुषाला ज्याप्रमाणे भोजनाची रूची नसते तद्वत् या मिथ्यादृष्टि जीवाला अनेकांतरूप वस्तूच्या सत्यर्थ तत्त्वाची रुची नसते. याचप्रमाणे रत्नत्रयरूप मोक्षमार्ग व दक्षलक्षणरूप दयाधर्म यांची रुची उत्पन्न होत नाही. उपशमसम्यक्त्वाच्या अतर्मुहूर्त कालामध्ये जर जघन्य एक समय व उत्कृष्ट सहा आवली शेरा राहिल्यावर व अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभातून एखाद्याचा उदय प्राप्त झाला तर तो जीव सम्यक्त्वापासून सुटून सासादन नामक दुसऱ्या गुणस्थानात येतो व त्याठिकाणी जघन्य एक समयन्य उत्कृष्ट सहा आवलीपर्यंत राहून नियमाने मिथ्यादृष्टि होतो. उपशमसम्यक्त्वाचा अंतर्मुहूर्त काल पूर्ण झाल्यानंतर त्याचे चार मार्गात रूपांतर होते. सम्यक्त्वमोहनीयाचा उदय प्राप्त होईल तर तो क्षयोपशम सम्यक्त्वी होील. मिश्रप्रकृतीचा उदय येईल तर मिश्रगुणस्थानी होईल. मिथ्यात्वाचा उदय प्राप्त होईल तर नियमाने मिथ्यादृष्टि होईल व अनंतानुबंधी कषायातून कोणा एका प्रकृतीचा उदय येईल तर सासादन गुणस्थानवर्ती होऊन नंतर मिथ्यादृष्टि होईल.

आता क्षायिकसम्यक्त्व कसे उत्पन्न होते हे थोडक्यात सांगतो. दर्शनमोहाच्या क्षयाने क्षायिक सम्यक्त्व होते व दर्शनमोह क्षय करणअयाचा आरंभ कर्मभूमीतील भाववेदी मनुष्यालाच होतो. भोगभूमीच्या मनुष्याला व समस्त देव नारकी तिर्यंचाना क्षायिकसम्यक्त्वाचा प्ररंमभ होत नाही. कर्मभूमीमध्ये देखील तार्थंकर किंवा अन्य केवली किंवा श्रुतकेवलीच्या चरणापाशी राहणारा असाच कोणी जीव दर्शनमोहनीय कर्म क्षय करण्याचा (क्षपणाचा ) आरंभ करतो. श्रुतकेवलीच्या जवळ सतत राहिल्याशिवाय तशी परिणामिवशुध्दता होत नाही. या ठिकाणी अध:करणाच्या प्रथम समयापासून तो मिथध्यात्वाच्या आणि मिश्रमोहनीयाचे कर्म सम्यक्त्वप्रकृतिरुप होऊन संक्रमण करतो. तोपर्यंत अंतर्मुहूर्त कालपर्यंतच्या कालाला दर्शनमोहनीयाच्या क्षपणाचा आरंभ काल म्हणतात. या आरंभकालाच्या पुढच्याच समयापासून क्षायिकसम्यक्त्व ग्रहण करण्याच्या पहिल्या समयापूर्वी (साधक): निष्ठापक सम्यग्दर्शन पूर्ण करतो. ज्या ठिकाणी क्षपणाचा प्रारंभ केला असेल असा कर्मभूमीचा मनुष्य निष्ठापक होतो. अथवा सौधर्मादि स्वर्ग व कल्पातीत अहमिंद्र व भोग भूमीतील मनुष्य तिर्यंच व धम्मा नामक प्रथम नरक-पृथ्वी याठिकाणीही निष्ठापक अू शकतो. कारण ज्याने पूर्वी आयुकर्म भांधिल आहे असा कृतकृत्य-वेदक-सम्यग्द्दष्ठि मरून चार ही गतीमध्ये उत्पन्न होत असतो व त्या ठिकाणी तो आपली क्षपणआ पूर्ण करतो. आता अनंतानुबंधी क्रोधमानमायालोभ, मिथ्यात्व, सम्यग्मिथ्यात्व. सम्यक्त्व प्रकृति या सात कृतींच्या क्षपणेचा क्रम असा आहे. कोणी वेदक सम्यग्द्दष्टि जीव असंयत, देशसंयत, प्रमत्त अथवा अप्रमत अशा चोहोपैंकी एखाद्या गुणस्थानात असून पूर्वी तीन करणांची विधी ज्याने केली असेल व त्यायोगे अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभाच्या

उदयावलीत असणाऱ्या निषेकांना नाहीसे केले असेल व उदयावलीच्या बाह्य असणाऱ्या सर्व निषेकांचे विसंयोजन (अप्रत्याख्यानावरण रूप परिणमन) करुन, अनिवृत्तिकरमाच्या अंतसमयामध्ये सर्व अनंतानुबंधी द्रव्याला द्वादश कषाय आणि नवनोकषाय रूप परिणमिवले असेल तेव्हा हे अनंतानुबंधीचे विसंयोजन होते. यातही गुणश्रेणी, स्थितिकांडकादि पुष्कळ विधी आहेत. याप्रमाणे विसंयोजन केल्यानंतर अंतर मुहूर्त कालापर्यंत विश्रांती घेऊन म्हणजे (दुसरी क्रिया न करता) तीन अध:करणादि करणांच्या योगे अनिवृत्तिकरणाच्या काळात मिथ्यात्व, सम्यग्मिथ्यात्त्व व सम्यक्त्व प्रकृती क्रमाने नाश कतो. त्याच्या करणांच्या (परिणामशुध्दीच्या) सामर्थ्याने ज्या ज्या कर्माच्या स्थितिअनुभागांचा नाश होतो, त्याचे वर्णन लब्धिसार ग्रंथातून पहावे. सारांश वरील सात प्रकृतींचा नाश केल्याने क्षायिक सम्यक्त्वी होतो. याप्रमाणे सम्यक्त्वाच्या तीन प्रकारांचे संक्षेपात वर्णन केले.

सम्यग्दृष्टी पुरुषामध्ये दुसरे आठ गुण प्रगट होत असतात. त्यावरून त्याला स्वत:स सम्यक्त्व उत्पन्न झाले आहे व इतरासही ते प्राप्त झाले आहे असा बोध होतो. ते आठ गुण म्हणजे संवेग, निर्वेद, आत्मनिंदा, गर्हा, उपशम, भक्ती, वात्सल्य आणि अनुकंपा ही बाह्यलक्षणे ज्या ठिकाणी दिसून येतील तेथे सम्यक्त्व आहे असे समजावे.

१. संवेग - म्हणेज धर्मावर प्रीती. संसारात भ्रमण करणाऱ्या मिथ्यादृष्टि जीवाची शरीरावर नेहमी अत्यंत प्रीती असते. त्याची इच्छा आपले शरीर निर्मळ राहाव, बलवान असावे, पुष्ट असावे व असे राहण्याकरिता अभक्ष्य भक्षण करण्यांत त्याला आनंद वाटतो. अन्यायाचरणाने संपादन केलेल्या द्रव्याने बनविलेल्या अलंकारांनी आपले शरीर भूषित करावे असे त्यास वाटते. पापकृत्याशी संबंध ठेवण्यात त्याला हर्ष वाटतो. विकथा करण्याविषयी आनंद वाटतो. स्त्री, पुत्र, धन, ऐश्वर्य, नगर, देश, राज्य वगैरे पदार्थावर तो अत्यंत प्रीती करतो. याच्या उलट प्रवृत्ती सम्यग्दृष्टि पुरुषाची असते. तो शरीरादिकावर ममत्व करीत नाही. दशलक्षण धर्मावर अनुराग करतो. त्यांची प्रवृत्ती सदैव धर्मकथा श्रवण करावी, धर्मात्मा पुरुषाशी चर्चा करावी, धर्मायतने स्थापन करावी अशी असते. अशा प्रवृत्तीलाच संवेग गुण म्हणतात. हा गुण सम्यग्दृष्टि पुरुषाला असतो.

२. निर्वेद - म्हणजे पंचपरिवर्तनरूप संसारातून, कृतघ्न अशा देहापासून व दुर्गतीला पोहोचविणाऱ्या या इंद्रियादिकांच्या भोगापासून विरक्त होणे हा दुसरा निर्वेद गुण होय.

३. आत्मनिंदा - आपल्या प्रमादामुळे, असंयम भावामुळे सांसारिक पापक्रियेत रममाण होणाऱ्या प्रवृत्तीबद्दल निरंतर आपली निंदा करीत रहाणे. तसेच दुर्लभ अशा मनुष्य जन्मामध्ये उत्पन्न होऊनही आपला एकक्षणही धर्माशिवाय इतर चिंतनात वाया जाणे हे ही त्यास अनर्थावह वाटते. याप्रमाणे आपल्याकडून घडणाऱ्या दोषांचा विचार करून आपल्या मनातच त्याबद्दल आपली निंदा करून घेणे हा आत्मनिंदा गुण आहे.

४. गर्हा - आपल्या गुरूपाशी अथवा सहधर्मी श्रावकापाशी नम्रपणाने आपण केलेले दोष प्रगट करणे हा गर्हा नामक गुण आहे.

५. उपशम - क्रोध, मान, माया, लोभाची सम्यग्दृष्टि पुरुषाला मंदता असतेच. राग, द्वेष काम, उन्माद, वैर वगैरे आपला नाश करणारे आहेत असे समजून त्यांचा त्याग करण्याविषयी तत्पर असलेल्या सम्यग्दृष्टि पुरुषाला उपशम नामक गुण प्राप्त होतो.

६. भक्ति - पाच परमेष्ठी, जिनवाणी, जिनेंद्राचे प्रतिबिंब या ठिकाणी व दशलक्षण धर्माला धारण करणाऱ्या धर्मवान पुरुषाच्या ठिकाणी व तपस्वीच्या ठिकाणी वसत असलेल्या अनेक गुणावर प्रती करणे भक्ति नामक गुण आहे.

७. वात्सल्य - म्हणजे धर्मवान जीवावर प्रीती करणे. दरिद्री पुरुषाला द्रव्य पाहून जसा आनंद होतो तसा आनंद धर्मवान व सम्यग्दृष्टि पुरुषाला पाहून व सम्यग्ज्ञानी पुरुषाने केलेले धर्मप्रवचन ऐकून उत्पन्न होणे हा सम्यग्दृष्टी पुरुषाचा सातवा वात्सल्य गुण आहे.

८. अनुकंपा - म्हणजे दया. समग्दृष्टी पुरुषाच्या मनात पट्काय जीवांची दया असतेच. परजीवांचे दु:ख पाहून जणू काय ते दु:ख आपणालाच होत आहे व ते दु:ख नाहीसे करण्याचे परिणाम होणे यास अनुकंपा म्हणातात.

या प्रमाणे असंख्या सत्परिणाम सम्यग्दृष्टी पुरुषांना सव्यमेव प्रगट होतात. ज्याला सत्यार्थ ज्ञान प्रगट झाले त्याच्या सर्व बाह्य अभ्यंतर क्रियांचे सद्गुणात रूपांतर होते.

सम्यग्दर्शनाने युक्त असणारा जीव सर्वांत मोठा आहे, असे दर्शविण्याकरिता सूत्र सांगतात -

सम्यग्दर्शनसंपन्नमपि मातङ्गदेहजम्।
देवा देवं विदुर्भस्मगूढाङ्गारान्तरौजसम्।।२८।।

अन्वयार्थ - (मातंगदेहजं अपि) चांडाळाच्या पोटी उत्पन्न झालेला असूनही (सम्यग्दर्शनसंपन्न) सम्यग्दर्शन संयुक्त असेल तर (देवं) तो देव आहे असे (देवा:) गणधरादिक (विदु:) समजतात. यास दृष्टांत (भस्मगूढांगारान्तारौजसं) विस्तव राखेने झाकलेला असला तरी तो तेजव्सी असतोच.

विशेषार्थ - ज्याला सम्यग्दर्शन प्रापत् झाले आहे असा चांडाळ असला तरी त्याला भगवान् गणधारांनी देवऱ्हटले आहे. हा हाडा-मांसाचा देह चांडाळापासून उत्पन्न झाला. म्हणून तो देह चांडाळ असेल, पण सम्यग्दर्शन ज्याला प्राप्त झाले आहे असा आत्मा दिव्यगुणांनी प्रकाशमान झाला आहे. म्हणून त्याच्या शरीराला उत्तम गुणाच्या प्रभावाने देव म्हटले आहे. ज्याप्रमाणे विस्तव राखेने झाकलेला असला तरी आत लखलखणाऱ्या तेजाने चमकत असतो त्याप्रमाणे सम्यग्दृष्टीचा आत्माही मलिन देहामध्ये गुणांच्या योगे दैदीप्यमान असतो. श्रीसमंतभद्राचार्य म्हणतात की, मस्यग्दृष्टी पुरुषाचा महिमा आम्हास आवडतो म्हणून आम्ही करतो असे नाही. तर भगवंताच्या द्वादशांगरूपी जिनवाणीत गणधर देव खुद्द सम्यग्दृष्टी चांडाळाला देव म्हणतात, हे शरीर मलमूत्राने भरलेले आहे व हाडमांस-चर्माने आच्छादिलेले आहे. यातून नवद्वाराने निरंतर दुर्गंध मल वाहत आहे. असा जरी अत्यंत मलिन देह साधूनंचा आहे तरी तो रत्नत्रायाच्या प्रभावाने इंद्रादिक देवांना दर्शन करण्यायोग्य, स्तवन करण्यायोग्य, नमस्कार करण्यायोग्य, नमस्कार करण्यायोग्य होतो. गुणाशिवाय चर्माच्छादित, कफ-मलाने भरलेल्या घाण देहाची कोणी वंदना केली असती, कोमी त्याला पूजिले असते व कोणी त्याला पाहिले असते( सारांश सम्यग्दर्शनादि गुणामुलेच शरीर वन्दनीय व पूजनीय आहे.

धर्म अधर्माचे फल

श्वापि देवो(पि देव: श्वा जायते धर्मकिल्बिषात्।
कापि नाम भवेदन्ता संपद्धर्माच्छरीरिणाम।।२९।।

अन्वयार्थ - (धर्म-किल्बिषात्) धर्माच्या व पापाच्या प्रभावाने (श्वा अपि देव:) कुत्रा देखील स्वार्गात देव होऊन जन्मतो (देव: अपि श्वा जायते) स्वर्गातील देव देखील कुत्रा होऊन जन्मतो (शरीरिणाम्) प्राणिमात्राला (धर्मात्) धर्माहून (अन्या) वेगळी (संपत्) संपत्ती (का नाम भवेत्) कोणती आहे बरे( धर्माच्या प्रभावाने अवर्णनीय अशी अहमिंद्र संपदा व अविनाशी मुक्तिसंपदा प्राप्त होते.

विशेषार्थ - मिथ्यात्वाच्या प्रभावाने दुसऱ्या स्वर्गापर्यंतचे देव एकेंद्रियामध्ये येऊन जन्मतात. अनंतानंत कालपावेतो त्रस-स्थावर जीवांमध्ये परिभ्रमण करीत फिरतात. बाराव्या स्वर्गापर्यंतचे देव मिथ्यात्वाच्या प्रभावाने पंचेंद्रिय-तिर्यंचामध्ये येऊन जन्मतात. म्हणून हा मिथ्यात्वभाव फार अनर्थ करणारा आहे असे जाणून सम्यक्त्व प्राप्त करून घेण्याचा यत्न करणे योग्य आहे.

कुदेवांना वंदन करणे योग्य नाही.

भयाशास्नेहलोभाच्च कुदेवागमलिंगिनाम् ।

प्रणामं विनयं चैव न कुर्यु: शुद्धदृष्टय: ।।३०।।

अन्वयार्थ - (शुद्धदृष्टय:) सम्यग्दृष्टी पुरुषांनी (भयाशास्नेहलोभात् च) भीतमुळे, किंवा आशेने अथवा स्नेहामुळे किंवा लोभास्तव, (कुदेवागमलिंगिनां) कुदेव, कुगुरु आणि कुशास्त्र याला (प्रमाणं विनयं च एव) नस्कार करू नये व त्यांचा सत्कार (न कुर्यु:) करू नये.

विशेषार्थ - ज्यांना काम, क्रोध, भय, इच्छा, क्षुधा, तृषा, राग, द्वेष मद, मोह, निद्रा, हर्ष विषाद, जन्म मरणादि दोष आहेत ते कुदेव होत. यांचा प्रभाव पंचमकालात फार वाढलेला आहे. एका सर्वज्ञ वीतराग देवाशिवाय इतर सर्व कुदेव आहेत. हिंसेला पुष्ट करणाऱ्या, रागीद्वेषी अशा मूढ जीवांनी प्रगट केलेल्या, पुर्वापरविरोधांनी भरलेल्या, विषयकषायादि आरंभांना पोषविणाऱ्या, प्रत्यक्षा व अनुमान प्रमाणांनी दूषित अशा शास्त्रांना कुआगम म्हणावे. हिंसादि पाच पापांचा त्याग करणे, आरंभ-परिग्रहरहित, देहाविषयी निर्ममत्व प्राप्त झाले आहे असे, उत्तम क्षमादिक दशधर्माला धारण करणारे, दोष टाळून अयाचक वृत्ती सांभाळणारे, दीनता ज्यांनी टाकली आहे असे, निर्जन स्थानामध्ये राहणारे, ध्यानाध्ययनामध्ये निरंतर प्रवर्तन करणारे, पाच इंद्रियांच्या विषयांना सोडणारे, षट्काय जीवांच्या विरोधनेचा त्याग करणारे, मौन धारण करून परक्ष याकडून मिळालेले सरस-नीरस व आपणाकरिताच मुद्दाम न बनविलेले अन्न रत्नत्रयाला सहायभूत म्हणून शरीराचे रक्षण करण्याच्या हेतूनेच एक वेळ ग्रहण करणारे अशा नग्न मुनीश्वराच्या लिंगा (चिह्ना) शिवाय, एक वस्त्र अथवा कौपीनधारक क्षुल्लकाच्या लिंगाशिवाय आणि एक वस्त्रधारी अर्जिकेच्या लिंगाशिवाय, जे इतर भेष आहेत ते सर्व कुलिंगी आहेत. त्यांना स्म्यग्दृष्टी पुरुष नमस्कार करीत नाहीत.

कोणत्याही भयाने नमस्कार करू नये.

याचप्रमाणे सम्यग्दृष्टी पुरूष भयाने कुदेवाला नमस्कार करीत नाही. ते भय असे: - या देवाला हजारो माणसे व राजे देखील नमस्कार करतात. याला जर मी नमस्कार केला नाही, तर या देवाला राग येऊन तो माझा नाश करील. माझी संपत्ती नाहीशी करील. माझ्या स्त्री-पुत्रादिकांचा घात करील अथवा याचा द्वेष करीत असल्याने तर माझ्या शरीरात हा रोग उत्पन्न झाला नाही ना( अथवा असे दु:ख त्या द्वेषामुळेच प्राप्त झालेल नसेल ना( द्वेषामुळे तो देव माझा नाश करील. या देशात रहणारे सर्व लोक याची पूजा करतात व माझ्या कुलातही माझे आजे-पणजे, आई-मामा, भाऊबंद वगैरे सर्वांनी याची पूजा केली आहे. आता मी जर ती परंपरा सोडून पूजा करण्याचे सोडीन तर माझे हे जे घर पुत्र- पौत्रादि व लक्ष्मीने भरलेले आहे त्या कदाचित कोणी मरण पावेल अथवा धनहानी प्राप्त होईल अथवा रोग उत्पन्न होईल तर सर्व लोक मला दूषण देतील. मला मोठे दु:ख होईल. सर्व लोक असे म्हणतात की या देवाला ज्यांनी ज्यांनी मानले नाही त्यांना याने आंधले करून टाकले आहे. या देवाची पूजा केल्याने, नवस केल्याने, याचा सत्कार केल्याने आजपावेतो अनेक जणांचे रोग नाहीसे झाले आहेत. हे जगन्नाथस्वामी आहेत. यांच्या पुरीमध्ये (सहरामध्ये) न्हावी, परीट, खाटीक, चांभार वगैरे सर्व एकत्र मिळून

उच्छिष्ट भक्षण करतात. असे न केले तर तो कोड उत्पन्न करण्याचे भय दाखवितो. याच्या पूजनापासून आंधळ्याला डोळे व दरिद्याला संपत्ती प्राप्त झाली आहे. याची निंदा करणाऱ्यांची संपत्ती नाहीशी झाली नाही. पूर्वी शनीश्वर देवाने क्रोधामुळे विक्रमादित्य राजाला संकटात टाकले होते. याप्रमाणे अनेक देवी, भैरव, हनुमा, गणपति, दुर्गा, चंडी सूर्यादिक ग्रहांचे भय मानून सम्यग्दृष्टी पुरुष त्याना नमस्कार करीत नाही. अथवा त्यांचा विनयसत्कारादि करीत नाही. तसेच आपणाला पुत्र प्राप्त व्हावा, अथवा संपत्ती प्राप्त व्हावी, राज्य प्राप्त व्हावे या आशेनेही ते वंदना करीत नाहीत. अथवा आमच्यावर या देवतेचा स्नेह आहे, आम्हाला दु:ख प्राप्त होते त्यावेळी आमचे रक्षण हीच देवता करीत असते असे समजूनही सम्यग्दृष्टी नमस्कार करीत नाही. लोभामुळेही कुदेवांचा सत्कार व नमस्कार सम्यक्त्वी करीत नाही. ज्या वेळेपासून मी ह्या देवतेची पूजा आरंभिली त्या दिवसापासून मला सारखा लाभ होत चालला आहे, मला मोठेपणा प्राप्त होत चालला आहे, अशा प्रकारच्या लाभाला या देवताच कारण आहेत असा संकल्प करून सम्यग्दृष्टी कुदेवाची आराधना करीत नाही. राजाच्या भयाने, आईबापाच्या भीतीने, कुटुंबाच्या भयाने व लोकलज्जेनेही तो कुदेवांना वंदना करीत नाही. याप्रमाणे जे शास्त्र रागद्वेष-हिंसेला पुष्ट करणारे असेल, ज्यात शृंगाराचे, युद्धाचे, स्त्रीचे वगैरे विकथांचे वर्णन व एकांतरूपाचे वस्तूचे स्वरूप सांगितले असेल, ज्यात मंत्र, तंत्र, वशीकरण, मारण, उच्चाटनादि साधनांचे वर्णन असेल, कुदेव-धर्माची आराधना करावी असे ज्या वर्णिले असेल, जे संसारामध्ये भ्रमण करविणारे असेल, त्या शास्त्राला सम्यग्दृष्टी पुरुष वंदन करीत नाहीत व त्याचा सत्कारही करीत नाहीत व त्याची रचना फार उत्कृष्ट आहे म्हणून प्रशंसाही करीत नाहीत. उलट त्याच्या वाचनापासून जीव संसारात पुन: भटकतील म्हणून तसे वाचू नये असा उपदेश करतात. भय, आशा, स्नेह व लोभ याला वश होऊन खोट्या आगमाचे ते प्रकाशन करीत नाहीत. आपल्या बापदादांनी अशा शास्त्रापासून पुष्कळ द्रव्य संपादन केले आहे व आपणही तिसेच द्रव्य संपादन करून आपली प्रतिष्ठा वाढवू व विद्वत्तेच्या जोरावर राजादिकांनाही आपले सेवक बनवू अशा लोभाने कुशास्त्राचे सेवन सम्यग्दृष्टी करीत नाही. जर ही प्रथा आपण चालू ठेवली नाही तर ापली आजीविका नाहीशी होईल व सर्व लोकात असलेली मान्यता कमी होईल या भीतीनेही सम्यग्द्दष्टी कुशास्त्राचे सेवन करीत नीत. हे शास्त्र वाचण्यात मन मोठे रंजायमान होते, यात मोठा कुभीदार रस भरलेला आहे, यातील कथा मोठी गोड आहे, यापासून लोकांना फार करमणूक होईल अशा समजुतीनेही कुशास्त्राचे आराधन सम्यग्द्दष्टी करीत नाहीत. कोणत्याही आशेने सम्यग्द्दष्टी कुशास्त्राचे सेवन करीत ननाहीत. अशा शास्त्राध्ययनापासून एखादी देवता आपणास सिध्द होईल, एखादी विद्य प्राप्त होईल, अशा लौकिक आशेला पडूनही ते कुशास्त्राची प्रशंसा व वंदना करीत नाहीत. सम्यग्द्दष्टी पुरुष कुलिंगी साधु मोठा तपस्वी आहे, याला अनेक विदया साध्य आहेत, याची राजावर देखील मोठी छाप आहे, सर्व लसोक याला फार पूज्य मानतात, याला जारण, मारण, उच्चाटनादि अनेक मंत्र शक्ती अवगत आहेत यामुळे कदिचत हा आपल नुकसान करील असे समजून भीतीने सम्यक्त्वी पुरुष ढोंगी साधऊंना कधी नमस्कार करीत नाहीत. यापासून आपणाला काही विद्या साध्य करून घ्यावयाची आहे, हा मोठा करामती आहे, याचा राजाजवळ फार वजन आहे, यापासून आपले काही काम करून घ्ावयाचे आहे, या लोभानेही सम्यग्द्दष्टी त्ाला नमस्कार करी नाही. याने मला एक रसायम देऊ केले आहे अथवा यांच्यापासून एक औषधाची माहिती करून घ्यावयाची आहे. न्याय व ज्योतिर्विद्या शिकून घ्यावयाची आहे म्हणून आपण त्यांची सेवा करू अशा प्रकारच्या अशा-लोभानेही विषयारंभी परिग्रहधारी खोट्या साधूला सम्यग्द्दष्टी नमस्कार करीत नाहीत. त्याची प्रशंसा करीत नाहीत, त्याला सत्यवादी म्हणत नाहीत व ते धर्मवान आहेत असे समजत नाहीत.

यावर कोणी शंका करील की, आपली इच्छा नसतांना जर कोणी बलिष्ठाने जबरीने आपणांस नमस्कार करावयास लाविले तर काय करावे ( त्याचे समाधान असे की, दुसर्याने जबरीने नमस्कार करावयास लावल्याने आपल्या श्रध्दानात बिघाड होत नाही. ज्यावेळी आपण

स्वत:देवतेला भयाने, आशेने, लोभाने नमस्कार करू  तेव्हाच श्रध्दान बिघडते. जबरीने कोणी दृष्ट म्लेच्छाने एखाद्या व्रती पुरुषाच्या मुखात अभक्ष्य घातल्याने त्याचे व्रत बिघडत नाही. अन्यमतांच्या शास्त्राचे अवलोकन करीत असात त्यांच्या देवांची स्तुती स्तोत्रे वाचली गेली, तरी ती फक्त वाचल्याने स्तुती झाले असे नव्हे तर सम्यग्दर्शन हा आत्म्याचा परिणाम आहे. त्या परिणामाने जर कुदेव हे सेवन करणअयायोग्य ाहेत असे वाटून त्यांचे स्तवन केले व त्यापासून आपले कल्याण आहे असे मानले तर त्याला सम्यक्त्वाचा अभाव झाला असे म्हणता येईल. केवळ इतर धर्मग्रंथातील स्तुती वगैरे वाचल्याने सम्यक्त्व नाहीसे होत नाही.

एखाद्या गृहस्थास राज्याधिकाऱ्यास जाऊन भेटावयाचे झाले, अगर त्यांनी काही विचारले व आपणास त्यांना काही सागण्याची इच्छा झाली तर त्यापुढे हात जोऊन उभे रहावे लागले तरी यात सम्यक्त्व नाहीसे होत नाही. चारित्र धारण करणारे गृहस्थ व साधू असतील तर ते मात्र हात जोडीत नाहीत व त्यांच्या शरीराचे शतश: तुकडे केले तरी ते धर्मकार्याशिवाय दुसरे वचन मुखावाटे उच्चारित नाहीत. साधु लोकांनी आपणास नमस्कार करावा अशी इच्छा दुष्ट मुष्य, म्लेच्छ राजे व इतर महापापी लोकांनीही होत नाही. संयमी पुरुष राजाला, चक्रवर्तीला, आईला, बापाला, विद्यागुरूला नमस्कार करीत नाही. संयमी द्विजन्मा आहे. अव्रत सम्यग्दृष्टीही वर सांगितलेल्या भयाने, लोभाने, आशेने स्नेहाने कुदेव, गकुगुरु, कुधर्माला नमस्कार करीत नाही. व्यवहारासंबंधी कार्यप्रयोजनात यथायोग्य त्यांचा आदरसत्कार करतो. कोणी जबरदस्ती केली तर देशत्याग करावा, आजीविका सोडावी, धनत्याग करावा पण कुधर्माचे सेवन व कुदेवाची आराधना करू  नये.

सम्यग्दर्शनाची श्रेष्ठता

दर्शनं ज्ञानचारित्रात् साधिमानमुपाश्नुते ।
दर्शनं कर्णधारं तन्मोक्षाणार्गे प्रचक्षयते ।। ३१ ।।

अन्वयार्थ - (ज्ञानचारित्रात्) ज्ञान व चारित्र यापेक्षा (दर्शनं) सम्यग्दर्शन हे (साधिमानं उपाश्नुते) श्रेष्ठ म्हटेले आहे. म्हणून (मोक्षमार्गे) मोक्षमार्गात (दर्शनं) दर्शनाला (कर्णधारं) कर्णधार (नावाडी) (प्रचक्षयते) असे म्हटले आहे. समुद्रात खलाशी लोक जहाज चालिवतात तद्याप्रर्माणे अपार संसार-समुद्रात रत्नत्रयरूपी जहाज चालिवण्यास सम्यग्दर्शन हे खलाशाप्रमाणे आहे. म्हमून याला कर्णधार म्हणतात. सारांश - रत्नत्रयांत सम्यग्दर्शन हे अति उत्कृष्ट आहे.

त्याचा हेतू

विद्यावृत्तस्य संभूतिस्थितवृध्दिफलोदया : ।
न सन्त्यसति सम्यक्त्वे बीजाभावे तरोरिव ।। ३२ ।।

अन्वयार्थ - (बीजाभावे) बीजाच्या अभावी (तरो: इव) जसा वृक्ष उत्पन्न होत नाही त्यापणाणे (विद्यावृतस्य) विद्या म्हणजे ज्ञान व वृत्त म्हणजे चारित्र यांची (संभूतिस्थितिवृध्दिफलोदया: ) उत्पत्ती, स्थिती, वृध्दी आणि फलोदय ही (असति सम्यक्त्वे) सम्यक्त्व नसले तर (न सन्ति) होत नाहीत.